# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२६

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### वन विभागात कार्यरत असलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना पदमुक्त करण्याबाबत

**(१) २२४२ (१५-०४-२०२५) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वन विभागात गत ६ महिन्यांत वर्ग १ व वर्ग २ ची पदे पदोन्नती व सरळ सेवेने भरलेली असतानाही अनेक सेवानिवृत्त अधिकारी अद्याप कार्यरत असल्याची बाब दिनांक २१ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन विभागात नियमित पदे भरली जात असतानाही सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या मानधनाचा नाहक भुर्दंड शासनाच्या तिजोरीवर पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाच्या अनुषंगाने वन विभागात कार्यरत असलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना तात्काळ पदमुक्त करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गणेश नाईक (२४-०६-२०२६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

राज्य कॅम्पा (CAMPA) प्राधिकरणासाठी मंजूर असलेल्या सहाय्यक वनसंरक्षक दर्जाची दोन्ही पदे शासन निर्णय दिनांक १३/०८/२०२४ व १०/०९/२०२४ अन्वये पदोन्नतीने नियमितपणे भरण्यात आली आहेत. तथापि, केंद्रस्थ अधिकारी (कक्ष-१७) कार्यालयाच्या प्रशासकीय निकडीस्तव, वित्त विभागाच्या दिनांक १७/१२/२०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार, विशेष अर्हता व अनुभवी मनुष्यबळा अभावी केवळ एका सेवानिवृत्त विभागीय वन अधिकाऱ्याची सेवा करार पध्दतीने घेण्यात आलेली आहे. याव्यतिरिक्त, राज्य कॅम्पा प्राधिकरणाच्या कामकाजासाठी बाह्य यंत्रणेद्वारे (Outsourcing) ३ समन्वयक सल्लागारांच्या सेवा तांत्रिक कामासाठी उपलब्ध करून घेण्यात आल्या आहेत.

(२) हे खरे नाही,

केंद्रीय ‘पर्यायी वनीकरण निधी अधिनियम, २०१६’ मधील कलम ११ (५) आणि ‘पर्यायी वनीकरण नियम, २०१८’ मधील नियम १३ च्या कायदेशीर तरतुदींनुसार, कॅम्पा प्राधिकरणाच्या गतिमान कामकाजासाठी कंत्राटी व तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करून घेण्याची तरतूद आहे. प्राधिकरणाचा वाढता

कार्यव्याप आणि वनीकरण प्रकल्पांचे सनियंत्रण (Monitoring) लक्षात घेता, बाह्य यंत्रणेमार्फत घेतलेल्या सेवांमुळे शासकीय तिजोरीवर कोणताही नाहक भुर्दंड पडत नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## कोकणातील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात वानर आणि माकडांच्या निर्बीजीकरण केंद्र उभारण्याच्या प्रस्तावाबाबत

**(२) २३१४ (१०-०७-२०२५) श्री.सुनिल शिंदे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणातील फळबागा तसेच इतर पिकांचे नुकसान करणाऱ्या वानर आणि माकडांचा बंदोबस्त करण्याच्या दृष्टीने रत्नागिरी तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यात निर्बीजीकरण केंद्र उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय असून, प्रस्तावच्या मान्यतेस आणि अंमलबजावणीसाठी किती कालावधी अपेक्षित आहे,
(३) असल्यास, फळबागा तसेच इतर पिकांचे नुकसान करणाऱ्या वानर आणि माकडांना आळा घालण्याच्या दृष्टीने रत्नागिरी तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यात निर्बीजीकरण केंद्र लवकरात लवकर उभारण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (२२-०६-२०२६) :** (१) हे खरे आहे.

वानर/माकड यांपासून होणारा उपद्रव टाळणेकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून वानर/माकड पकडुन त्यांचे निर्बीजीकरण करणेकरीता सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये कुडाळ येथील कुडाळ पशुवैद्यकीय उपचार केंद्र आणि रत्नागिरी येथील दापोली पशुवैद्यकीय उपचार केंद्र आणि रत्नागिरी पशुवैद्यकीय उपचार केंद्र येथे माकड/ वानर निर्बीजीकरण केंद्र स्थापन करणे प्रस्तावित आहे.
(२) हिमाचल प्रदेशमध्ये मानव-माकड/वानर संघर्ष मोठ्या प्रमाणात झालेला होता. त्यामुळे तेथील वनविभाग यांनी मानव-माकड/वानर संघर्ष कमी करणेकामी २००७ पासून वानर निर्बीजीकरण चालु केलेले आहे. याच धर्तीवर हिमालचप्रदेश मधील पध्दतीचा अभ्यास करून, प्रमाणभुत प्रचलीत कार्यपध्दत निश्चित करण्यात आलेली आहे.
(३) फळबागा तसेच इतर पिकांचे नुकसान करणाऱ्या वानर आणि माकडांना आळा घालण्याच्या दृष्टीने निर्बीजीकरण केंद्र उभारण्याकरीता पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:- चिपळूण आणि सावंतवाडी वनविभागामध्ये Rapid Response Team (RRT) स्थापन केले असून, त्यांचेद्वारे उपद्रव करणारे वानरांना पकडण्यात यश आले आहे.
• माकड/वानर निर्बीजीकरण करणेची प्रमाणभुत प्रचलीत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.
• निर्बीजीकरण केंद्र निश्चित करण्यात आलेले आहेत.
• माकड/वानर निर्बीजीकरण करण्याकरीता त्यांची संख्या निश्चित करणे आवश्यक असल्याने, डॉ. एच. एन. कुमारा, प्रमुख शास्त्रज्ञ संवर्धन जीवशास्त्र, सलीम अली सेंटर फॉर ऑर्निथोलॉजी ॲण्ड नॅचरल हिस्ट्री

(SACON) कोईम्बतूर, यांचेकडून सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यामध्ये माकड/वानर वन्यप्राण्यांची प्रगणना करणे व त्यांची संख्येची झालेली वाढ याबाबत सर्व्हे करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पनवेलमध्ये "वारकरी भवन" उभारण्याबाबत

**(३) २३९७ (१७-०७-२०२५) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड, ठाणे आणि नवी मुंबई या भागातून मोठ्या प्रमाणात वारकरी आळंदी आणि पंढरपूर येथे वारीसाठी जात असल्याने पनवेल हे शहर या दिंड्यांच्या विसाव्यासाठी अतिशय योग्य असल्याने पनवेलमध्ये "वारकरी भवन" उभारण्याची मागणी वारकरी महामंडळाच्या शिष्टमंडळाकडून सातत्याने केली जात असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वारकरी शिष्टमंडळाने वारकऱ्यांच्या विसाव्याच्या दृष्टीने केलेल्या या मागणीचा सकारात्मक विचार करून पनवेल येथे "वारकरी भवन" उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.संजय शिरसाट (२३-०६-२०२६) :** (१)हे खरे नाही,
(२) पनवेलमध्ये "वारकरी भवन" उभारण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्यानुषंगाने तपासून नियमानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गल्लेबोरगाव (ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर) येथे अद्रक संशोधन केंद्र उभारण्याबाबत

**(४) २४४५ (१०-०७-२०२५) श्री.अंबादास दानवे, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गल्लेबोरगाव (ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर) येथे अद्रक संशोधन केंद्र उभारण्याची घोषणा शासनाने सात वर्षांपूर्वी करुनही सदर केंद्रासाठी १०० एकर जागेची आवश्यकता असताना अद्याप जागा उपलब्ध करून देण्यात आलेली नसल्याचे माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यातील खुलताबाद, कन्नड, सिल्लोड, फुलंब्री व इतर तालुक्यांमधील शेतकऱ्यांना अद्याप सुधारित वाण, साठवणूक, प्रक्रिया व शास्त्रीय मार्गदर्शनासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध झाल्या नसल्यामुळे व योग्य दर मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संशोधन केंद्र सुरु करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी व शेतकरी संघटनांनी सातत्याने मागणी करूनही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले तसेच सदर केंद्राकरीता जमिनीचे हस्तांतरण, निधी उपलब्धता, मंजुरी, प्रकल्प आराखडा तयार करणे व प्रत्यक्ष काम सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (१३-०४-२०२६) :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) गल्लेबोरगाव (ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर) येथे अद्रक संशोधन केंद्र स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी शासनास सादर केला होता.त्यानुषंगाने, कृषी विभागाकडून सन २०२२ मध्ये नियोजन व वित्त विभागास सदर प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने, नियोजन विभागाने आगामी काळात अशाप्रकारे प्रत्येक पिकासाठी राज्याच्या विविध भागांत वेगवेगळी संशोधन केंद्रे स्थापन करण्याबाबत मागणी/प्रस्ताव प्राप्त होण्याची शक्यता वर्तवून राज्य शासनावर आर्थिक भार वाढण्याची शक्यता प्रकट केली. तसेच, केवळ जमिनीची उपलब्धता, मागणी व गरज इ. बाबींच्या आधारे संशोधन केंद्र स्थापन करणे योग्य होणार नाही, असेही अभिप्राय नमूद केले. तद्नंतर वित्त विभागाने नवीन अद्रक संशोधन केंद्र स्थापन करण्याऐवजी, सद्य:स्थितीत परभणी कृषी विद्यापीठांतर्गत कार्यरत असलेल्या संशोधन केंद्राचे विस्तारीकरण/आधुनिकीकरण करुन कार्यरत संशोधन केंद्रातच अद्रक पिकावरील संशोधन करावे, असे अभिप्राय दिले आहेत.

सद्य:स्थितीत, राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत, नवीन कृषी महाविद्यालयांचे तसेच, नवीन संशोधन केंद्राचे शासनावरील दायित्व तसेच, कृषी महाविद्यालयांतील रिक्त जागा विचारात घेवून दिनांक २०/०३/२०२५ रोजी झालेल्या मा.मुख्यमंत्री महोदयांच्या बैठकीतील निदेशानुसार सदरचे दायित्व कमी होईपर्यंत नवीन कृषी महाविद्यालये/संशोधन केंद्रे स्थापन न करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वाढवण (जि.पालघर) बंदरात भूमिपुत्रांना नोकरी देण्याबाबत

**(५) २४८९ (१०-०७-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाढवण बंदर (जि.पालघर) भूमिपुत्रांचा विरोध डावलून उभारले जात असून वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड यांचेकडून बंदर परीघात येणाऱ्या अनेक गावांमधील तरुणांकडून अर्ज भरून घेऊन व त्यांना वेगवेगळे प्रशिक्षण देऊन नोकरीचे आमिष दाखविले जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकल्पांतर्गत किती विद्यार्थ्यांना व तरुणांना रोजगाराच्या संधी दिल्या जाणार व किती नोकऱ्या कायमस्वरूपी तसेच अंशकालीन असणार आहेत याबाबतची माहिती अधिकारात माहिती

मागविली असताना जेएनपीटीने कोणत्याही प्रकारचे माहिती दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त वाढवण बंदर प्रकल्पात स्थानिकांना नोकरी उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच जेएनपीटीने याबाबत अधिकृत माहिती जाहीर करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नितेश राणे (१०-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही.

वाढवण बंदर हा देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाचा प्रकल्प असून तो सर्व वैधानिक व पर्यावरणीय नियमांचे पालन करून राबविला जात आहे. सदर प्रकल्पामुळे १२ लाखांहून अधिक रोजगार संधी निर्माण होणार असून, स्थानिक तरुणांना त्यासाठी पात्र बनविण्यासाठी विनामूल्य (अनुदानित) कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे. हे आमिष नसून, स्थानिकांच्या सर्वांगीण विकासाची प्रक्रिया आहे.
(२) हे खरे नाही.
माहिती अधिकारांतर्गत मागविलेली सर्व माहिती जवाहरलाल नेहरु बंदर प्राधिकारण (जनेबंप्रा) कडून पारदर्शकपणे उपलब्ध करून देण्यात आली आहे.
(३) स्थानिकांना रोजगारासाठी सक्षम करण्याच्या दृष्टीने जेएनपीटीने महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. व्हॉट्सॲप-आधारित चॅटबॉटद्वारे प्रशिक्षण नोंदणी सुलभ करण्यात आली असून, २५ नामांकित संस्थांशी सामंजस्य करार करण्यात आले आहेत. तसेच, हेवी व्हेईकल ड्रायव्हिंग, संगणक प्रशिक्षण, मत्स्य प्रक्रिया व मत्स्यव्यवसायाशी संबंधित विविध कौशल्यविकास अभ्यासक्रम यशस्वीपणे राबविले जात आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उप जिल्हाधिकाऱ्यांना अपर जिल्हाधिकारी पदी पदोन्नती दिल्याने ८० हून अधिक पदे रिक्त असल्याबाबत

**(६) २५०४ (१०-०७-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने ८० उप जिल्हाधिकाऱ्यांना अपर जिल्हाधिकारी पदी पदोन्नती दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागांवर तहसिलदारांची पदोन्नती होणे अपेक्षित असताना सेवाज्येष्ठता यादीतील गोंधळामुळे सदर पदोन्नती रखडली असून ८० हून अधिक उपजिल्हाधिकारी पदे रिक्त असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सेवा प्रवेश नियमावलीनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (MPSC) सरळसेवेने नियुक्त झालेल्या तहसिलदारांना उपजिल्हाधिकारी पदावर पदोन्नती देताना वर्षानिहाय ३३ टक्के कोटा राखणे बंधनकारक असूनही सदर कोटा कमी ठेवण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) सरळ सेवेतील तहसिलदारांना गेल्या ११ वर्षांपासून पदोन्नतीपासून वंचित ठेवण्यात आले असून, दिनांक २९ डिसेंबर, २०२३ रोजी प्रसिध्द झालेली सेवा ज्येष्ठता यादी रद्द करून सुधारित अंतिम यादी प्रकाशित करावी व त्यानंतरच तहसिलदारांचा कोटा राखून पुढील पदोन्नती द्यावीअशी मागणी सरळ सेवा

तहसिलदारांनी महसूल मंत्र्यांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४)असल्यास, उपरोक्त मागणीनुसार योग्य प्रमाणात कोटा राखून सेवा ज्येष्ठता यादीतील त्रुटी व अडचणीं दूर करुन उपजिल्हाधिकारी पदावर तहसिलदारांची पदोन्नती होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (२७-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) तहसिलदार संवर्गाच्या सेवाप्रवेश नियम-१९८९ नुसार "सरळसेवेने नियुक्त तहसिलदारांची संख्या एकूण संख्येच्या २५ टक्केपेक्षा कमी तसेच ३३ टक्केपेक्षा अधिक असणार नाही." अशी तरतूद आहे.

सर्व विभागीय आयुक्त कार्यालयांमार्फत पदोन्नती कोटयातील तहसिलदार संवर्गातील अधिकाऱ्यांच्या नियमितीकरणाबाबतची कार्यवाही ही पदोन्नत कोटयाकरीता उपलब्ध असलेल्या पदांवरच करण्यात आलेली आहे. सदरहू नियमितीकरण करताना सरळसेवा कोटयातील पदे वापरण्यात आलेली नाहीत. त्यामुळे सर्व विभागीय आयुक्त कार्यालयांमार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या विभाग स्तरावरील तहसिलदार संवर्गाच्या ज्येष्ठतासूचींचे एकत्रिकरण करुन तहसिलदार संवर्गाची दिनांक ०१/०१/१९९७ ते दिनांक ३१/१२/२०१५ या कालावधीची राज्यस्तरावरील एकत्रित अंतिम ज्येष्ठतासूची शासन परिपत्रक, दिनांक १३/१०/२०२५ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदरहू अंतिम ज्येष्ठतासूचीच्या आधारे तहसिलदार संवर्गातील सेवाजेष्ठ आणि पात्र असलेल्या १०९ अधिकाऱ्यांना दिनांक ११/११/२०२५ रोजी उप जिल्हाधिकारी पदी पदोन्नती देण्यात आली आहे. उप जिल्हाधिकारी पदावरील पदोन्नतीबाबतची कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात "एक रुपयात पीक विमा योजना" अंतर्गत शेतकऱ्यांच्या खात्यावर अत्यल्प रक्कम जमा करण्यात आल्याबाबत

**(७) २५१८ (१०-०७-२०२५) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २०२२ पासून लागू असलेल्या "एक रुपयात पीक विमा योजना" अंतर्गत शेतकऱ्यांच्या खात्यावर नुकसानभरपाई म्हणून १९ रुपये १६ पैसे व २७ रुपये ९१ पैसे इतकी अत्यल्प रक्कम जमा करण्यात आली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गंगापूर तालुक्यातील रांजणगाव शेणपुंजी येथील सचिन व सागर सवई या शेतकऱ्यांनी अनुक्रमे ४३ व २७ गुंठे क्षेत्रावर गहू पिकाची पेरणी करून पीक विमा उतरविल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांनी नुकसानाच्या वेळेस विमा कंपनीकडे विहित पध्दतीने कागदपत्रे सादर करुनही विमा कंपनीकडून दीड

वर्षानंतर अत्यल्प रक्कम अदा करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, काही प्रकरणांमध्ये शेतकऱ्यांनी एकापेक्षा अधिक अर्ज केले असल्यास नुकसानभरपाई रक्कम 'राउंड ऑफ' करून एकत्रितपणे केवळ १००० रुपयांपर्यंत मर्यादीत ठेवण्याची प्रक्रिया राबविण्यात येते तरीही वरील प्रकरणात ती मर्यादा पूर्ण करण्यात आली नसल्याने गंगापूर तालुका शेतकरी मित्र संघटनेमार्फत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आली असूनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या विमा कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच पीक विमा उतरविल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची पूर्ण रक्कम मिळावी यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दत्तात्रय भरणे (१७-०२-२०२६) :** (१) व (२) होय.
(३) व (४) जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी संबंधित विमा कंपनीस याबाबत निर्देश दिल्यावर, सबंधित दोन शेतकऱ्यांना अनुक्रमे रुपये ५७५०.४३ व रुपये ६३२५.५६ इतक्या रकमेची नुकसान भरपाई देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वन विभागाच्या मचाण उपक्रमातील शुल्क वाढीबाबत

**(८) २५७५ (१०-०७-२०२५) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोकांना पर्यावरण व वन्यजीव संवर्धनाविषयी जागरूक करण्यासाठी वन विभागकडून बुध्दपोर्णीमेला "मचाण उपक्रम" राबविला जात असून, गेल्या काही वर्षापासून या उपक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्कात लक्षणीय वाढ करण्यात आली असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विविध व्याघ्र प्रकल्पांसाठी आकारण्यात येणारे शुल्क वेगवेगळे असल्याने उपक्रमाचा जनजागृतीचा मूळ उद्देश असफल होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निसर्गानुभवासारख्या उपक्रमातून खऱ्या अर्थाने जनसामान्यांना निसर्गाचा अनुभव देण्यासाठी नाममात्र शुल्क आकारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गणेश नाईक (२५-०२-२०२६) :** (१) दरवर्षी बुध्द पौर्णिमेचे दिवशी पाणवठा प्रगणना उपक्रम आयोजीत करण्यात येतात, मागील दोन वर्षात पौर्णिमेचा दिवशी मचाणाचे प्रवेश शुल्क खालीलप्रमाणे आकारण्यात आले आहे.

१. ताडोबा- सन २०२४ व २०२५ करीता रुपये ४,५००/- मचाण पर्यंत जिप्सीने ने-आण करणे जिप्सी शुल्क, मार्गदर्शन शुल्क, प्रवेश शुल्क (२ व्यक्तींकरीता). ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पामध्ये सन २०२५ मध्ये फक्त बफर क्षेत्रातील मचाणावर बाहेरील व्यक्तींना प्रवेश देण्यात आला होता.कोअर क्षेत्रात बाहेरील व्यक्तींना प्रवेश नव्हता, आकारण्यात आलेले शुल्क प्रती व्यक्ती नसुन प्रती मचाण (दोन व्यक्तींसाठी)
२. मेळघाट- सन २०२४ करीता रुपये २,४००/- ते ३५००/- व २०२५ करीता रुपये ३०००/- ते ३५००/- जिप्सीने ने-आण करणे जिप्सी शुल्क, जेवण, पाणी (१ व्यक्तींकरीता). मेळघाट व्याघ्र प्रकल्पात आकारण्यात येणाऱ्या शुल्कात लक्षणीय वाढ झालेली नसून नाममात्र शुल्क आकारण्यात आलेली आहे.
३. नवेगाव-नागझिरा - सन २०२४ व २०२५ करीता रुपये २,०००/- मचाण पर्यंत जिप्सीने ने-आण करणे जिप्सी शुल्क, जेवण नास्ता व पाणी शुल्क (१ व्यक्तींकरीता). नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पामध्ये बुध्द पौर्णिमेला प्रगणकांकडून मचाण उपक्रमात माफक शुल्क आकारले जाते.
४. पेंच - सन २०२४ व २०२५ करीता रुपये २,०००/- मचाण पर्यंत जिप्सीने ने-आण करणे जिप्सी शुल्क, जेवण नास्ता व पाणी शुल्क (१ व्यक्तींकरीता) टी शर्ट प्रति व्यक्ती. पेंच व्याघ्र प्रकल्पामध्ये पेंच व्याघ्र प्रकल्प नागपूर व बोर व्याघ्र प्रकल्प, वर्धा या विभागाद्वारे दरवर्षी पेंच व्याघ्र प्रकल्प व उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्यामध्ये बुध्द पौर्णिमेला लोकांना पर्यावरण व वन्यजीव संवर्धनाविषयी जागरुक करण्यासाठी पाणस्थळावरील निसर्गानुभव कार्यक्रम राबविण्यात येत आहे. पेंच प्रकल्प प्रशासनाकडून सन २०२२ पासून रुपये २०००/- एवढेच शुल्क आकारण्यात येत आहे. या शुल्कामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात आलेली नाही.

(२) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पांतर्गत आयोजीत उपक्रमातून प्राप्त शुल्कापैकी जवळपास ७० टक्के रक्कम ही स्थानिक गावकऱ्यांना उपलब्ध होत असून सदर उपक्रमासाठी मोठ्या प्रमाणावर नागरीक नोंदणी करतात. त्यामुळे या उपक्रमामुळे जनजागृतीचा उद्देश सफल होण्यास मदत होते.

पेंच व्याघ्र प्रकल्प व बोर व्याघ्र प्रकल्पाद्वारे बुध्दपौर्णिमेला आयोजीत होणाऱ्या पाणस्थळावरील निसर्गानुभव कार्यक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्कामध्ये सहभागींना एकवेळचे जेवण, सकाळचा नाश्ता, पिण्याचे पाणी व टी शर्ट इत्यादी बाबींचा समावेश आहे. तसेच सदर कार्यक्रमाकरीता आकारण्यात येणाऱ्या शुल्कामध्ये सहभाग घेणाऱ्या व्यक्तींना वनपरिक्षेत्र कार्यालयापासून त्यांचे नियोजित मचाण पर्यंत ने-आण करण्याची बाब सुध्दा समाविष्ठ असते. अशा प्रकारच्या कार्यक्रमामध्ये जनसामान्यामध्ये वन व वन्यजीव संवर्धन व संरक्षण याबाबत व्यापक जाणीव जागृती निर्माण करण्यात येते. ज्यामुळे अशा प्रकारच्या कार्यक्रमाचा मूळ उद्देश पेंच व्याघ्र प्रकल्पाद्वारे साध्य करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत सदर कार्यक्रम राबवितांना नागरीकांमध्ये जनजागृती व्हावी हाच उद्देश आहे. कार्यक्रमापुर्वी कार्यशाळा घेवुन सहभागी नागरिकांना पर्यावरण व वन्यजीव विषयक महत्व पटवुन देण्यात येते तसेच त्यांना मार्गदर्शन करण्यात येते.

(३)सर्व व्याघ्र प्रकल्पाकडून त्यांचे स्तरावरुन कमी प्रमाणात नाममात्र शुल्क आकारण्यात येत आहे. तसेच या माध्यमातून जनजागृती होणे ह्या उद्देशातुनच हा उपक्रम राबविला जातो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील पाणंद रस्त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(९) २७०१ (१०-०७-२०२५) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील पाणंद रस्त्यासाठी मुख्यमंत्री पाणद रस्ते, मातोश्री पाणंद रस्ते योजनेतर्गत रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून केवळ २ हजार किलोमीटरचे रस्ते तयार करण्यात आले असून आता शासनाने बळीराजा पाणंद रस्ते करण्याची घोषणा केल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्यासह शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या दृष्टीने महत्वाच्या असल्याने सदर योजनेसाठी स्वतंत्र निधीची आवश्यकता असताना उपलब्ध करून न दिल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील ग्रामीण भागातील पाणंद रस्त्यासाठी मुख्यमंत्री पाणंद रस्ते, मातोश्री पाणंद रस्ते योजनेकरीता स्वतंत्र निधी उपलब्ध करुन देण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले (१०-०४-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजनेंतर्गत पूर्ण झालेल्या कामांना पुरक कुशल निधी उपलब्ध करुन देण्यासाठी अर्थसंकल्पीय तरतुद करण्याकरीता स्वतंत्र लेखाशीर्ष उपलब्ध आहे. शासनस्तरावरुन मान्यताप्राप्त कामांना सन २०२३-२४ मध्ये रुपये १०१ कोटी आणि सन २०२४-२५ मध्ये रुपये १५१ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. राज्यात रोहयो अंतर्गत १७ हजार शेत/पाणंद रस्त्याची कामे पूर्ण झाली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागोठणे (ता.रोहा, जि.रायगड) विभागात हायपर टेन्शन वायरीमुळे शेतकऱ्यांच्या जमिनी बाधित झाल्याबाबत

**(१०) २७११ (१०-०७-२०२५) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक २३४८९ ला दिनांक ९ जुलै, २०२४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागोठणे (ता.रोहा, जि.रायगड) विभागातील जे एस डब्ल्यू व्यवस्थापन व विद्युत विभागाच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना विश्वासात न घेताच हायपर टेन्शन लाईन टाकली असल्याने स्थानिक शेतकऱ्यांनी आंदोलन केले असल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जेएसडब्ल्यूच्या व्यवस्थापनाने नियम धाब्यावर ठेवून नागोठणे ते वडखळ दरम्यान टाकलेल्या हायपर टेन्शन वायरमुळे शेतकऱ्यांच्या जमिनी बाधित होणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१३-०३-२०२६) :** (१), (२) व (३) रोहा तालुक्यातील मौजे वेलशेत, पळस, शेतपळस व निडी तर्फे नागोठणे या गावांतून जे.एस.डब्लू स्टील कंपनीसाठी १२५ MW वीजपुरवठा करण्यासाठी हायपर टेन्शन लाईन टाकण्याचे काम उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक-पावामो- २०२१/प्र.क्र.१७०/ऊर्जा-४, दिनांक ०२ नोव्हेंबर २०२२ अन्वये व शासन निर्णय क्र.पावामो-२०२१/प्र.क्र.१७०/ऊर्जा- ४, दिनांक ०१ डिसेंबर २०२२ मधील तरतुदीनुसार प्रस्तावित आहे.

सदर कामामुळे बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांनी मार्च-२०२५ व त्यादरम्यान आंदोलन केले होते. तद्नंतर उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक-पावामो-२०२१/प्र.क्र.१७०/ऊर्जा-४, दिनांक ०१/१२/२०२२ अन्वये उपविभागीय अधिकारी, रोहा यांच्या अध्यक्षतेखाली उपविभागीय स्तरीय मुल्यांकन समिती गठीत करण्यात आली असून बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई र.रुपये १५००/- प्रति चौ.मी. या दराने निश्चित केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील जैवविविधता समित्या पुनर्जिवीत करण्याबाबत

**(११) २७४० (१०-०७-२०२५) श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बहुसंख्य ग्रामपंचायतींमध्ये जैवविविधता समित्या स्थापन करण्यात आल्या असल्या तरी त्या केवळ कागदोपत्री असून प्रत्यक्षात ‘People’s Biodiversity Register’ (PBR) तयार केला जात नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा समित्यांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षणाची तरतूद असूनही त्या अनुषंगाने प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने ‘राहीबाई पोपरे’ सारख्या महिला स्वतः पुढाकार घेऊन काम करत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जैवविविधता समित्यांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी ‘People’s Biodiversity Register’ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तसेच महिला सदस्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (२७-०४-२०२६) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

मा.राष्ट्रीय हरित लवाद नवी दिल्ली यांनी न्या. प्रकरण क्र. ३४७/२०१६ मध्ये दिलेल्या आदेशानुसार प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेने त्यांच्या अधिकार क्षेत्रात जैवविविधता व्यवस्थापन समिती

व लोक जैवविविधता नोंदवही तयार करण्याचे आदेश आहेत. त्या अनुषंगाने मा.राष्ट्रीय हरित लवाद नवी दिल्ली यांनी त्यांचे दिनांक ०९/०८/२०१९ च्या आदेशान्वये दिनांक ३०/०१/२०२० पर्यंत प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेने त्यांच्या जैवविविधता व्यवस्थापन समितीने स्वयंसेवी संस्था/विषयतज्ञांची मदत घेऊन लोक जैवविविधता नोंदवह्या तयार केलेल्या आहेत. राज्यात २८६४९ जैवविविधता व्यवस्थापन समित्या व समित्यामार्फत लोक जैवविविधता नोंदवह्या तयार करण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्र राज्य जैवविविधता नियम, २००८ मधील नियम २३ (३) नुसार (३) पोट नियम (२) अन्वये गावांसाठी असलेल्या जैवविविधता व्यवस्थापन समित्यांची, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम ४९ नुसार गाव पातळीवर ग्रामसभेच्या विकास उप समिती म्हणून स्थापन करण्यात येईल. इतर सर्व बाबतीत या समित्यांवर ग्रामसभेद्वारे निवडलेल्या सात व्यक्ती असतील. त्यापैकी एक तृतीयांशपेक्षा कमी नसतील इतक्या महिला असतील.

जैवविविधता व्यवस्थापन समित्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी व लोक जैवविविधता नोंदवही तयार करण्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी, तसेच महिला सदस्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्यासाठी राष्ट्रीय जैवविविधता प्राधिकरण, चेन्नई यांनी लोक जैवविविधता नोंदवहीची मार्गदर्शक तत्वे २०१३ मध्ये तयार केलेली आहेत. लोक जैवविविधता नोंदवहीची मार्गदर्शक तत्वे तयार करताना सहभागाची व्यवस्था अंमलात आणून त्यात गावाच्या निरनिराळ्या स्तरांमधल्या लोकांचा समावेश असावा. तसेच नोंदी घेतांना स्त्री-पुरुष दोघांच्याही दिलेल्या माहितीची/ मतांनी नोंद व्हावी. तसेच लोक जैवविविधता नोंदवही तयार करण्याकरीता बऱ्याच लोकांचे जे त्यांना असलेले ज्ञान, विशेष ज्ञानाचा वापर करुन देऊ शकतात. लोक जैवविविधता नोंदवही तयार करण्यासाठी प्रथमत: समुह बैठक आयोजीत करून हे कार्य करण्यामागचा उद्देश व हेतु स्पष्ट करणे ही पहिली बाब आहे. जैवविविधता समित्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी व लोक जैवविविधता नोंदवहीची अंमलबजावणी करण्यासाठी पंचायत समिती, ग्रामस्तरावर वेळोवेळी भेटी देऊन कार्यशाळा तसेच मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. मराठी भाषेतून मार्गदर्शक पुस्तिका तयार करून त्यांचे वाटप करण्यात आलेले आहेत. सन २०२५-२६ मध्ये २२ कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगाव जिल्ह्यात बोगस कापूस बियाणे विक्री होत असल्याबाबत

**(१२) २८९३ (१०-०७-२०२५) श्री.एकनाथराव खडसे, श्री.कृपाल तुमाने, श्री.हेमंत पाटील, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चुंचाळे (ता.चोपडा, जि.जळगाव) येथे गुजरात बनावटीची १२७३ बनावट HTBT कापूस बियाण्याची पाकिटे सापडल्याचे व अशा बोगस बियाण्यांच्या विक्रीमुळे शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक होत असल्याची बाब दिनांक २४ एप्रिल २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोगस बियाणे विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याकरीता तसेच शेतकऱ्यांना विश्वसनीय बियाणे उपलब्ध करून देण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (०३-०२-२०२६) :** (१) होय.
(२) व (३) बोगस बियाणे विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याकरीता तसेच शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे उपलब्ध करुन देण्यासाठी विभागात ४५ भरारी पथकामार्फत तपासण्या केल्या असून परराज्यातील सीमेलगतच्या भागात अधिक दक्षता घेण्याचे आदेश संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित यंत्रणेस दिलेले आहेत.

---

## नाशिक आदिवासी विभागांतर्गत खाजगी आश्रम शाळेतील कर्मचारी यांच्या परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेतील कपातीच्या हिशोब मिळत नसल्याबाबत

**(१३) २९२४ (१०-०७-२०२५) श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक विभागातील आदिवासी विकास विभागाअंतर्गत कार्यरत खाजगी आश्रमशाळांतील कर्मचाऱ्यांच्या DCPS (Defined Contribution Pension Scheme) कपातीचा तपशील शासनाकडे उपलब्ध नसल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास खाजगी आश्रमशाळांतील कर्मचाऱ्यांच्या वेतनातून DCPS अंतर्गत १०% जादा रक्कम कपात केली जात असूनही संबंधित कपातीचा हिशोब मिळत नसल्याने NPS (National Pension System) खाती उघडण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, खाजगी आश्रम शाळेतील कर्मचारी यांना DCPS मधून NPS खाती उघडण्यास शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक ऊईके (१३-०२-२०२६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
अनुदानित आश्रमशाळांमधील कर्मचाऱ्यांच्या वेतनातून DCPS अंतर्गत १०% कर्मचारी हिस्सा जमा होत आहे.शासनाचा हिस्सा जमा करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे. तथापि, त्याव्यतिरिक्त अन्य कोणतीही जादा रक्कम कपात करण्यात येत नाही.
(३) शासनाच्या दिनांक १३/०१/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्याची परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) लागू असणाऱ्या आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यात स्वयंसेवी संस्थाद्वारा चालविण्यात येणाऱ्या अनुदानित आश्रमशाळांमधील १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली (NPS) लागू करण्यात आली असून NPS खाती उघडण्याबाबतची कार्यपध्दती निर्धारीत करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बल्लारशहा-चंद्रपुर-गोंदिया रेल्वे मार्गावर झालेल्या विविध अपघातांबाबत

**(१४) ३१०२ (१०-०७-२०२५) श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प तसेच चंद्रपूर व गोंदिया वनक्षेत्रातून जाणाऱ्या बल्लारशाह–चंद्रपूर–गोंदिया रेल्वे मार्गावर झालेल्या विविध अपघातांत सन २००१ ते २०२५ या कालावधीत सुमारे १३० वन्यजीव मृत्यूमुखी पडल्याची बाब दिनांक १ मे, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रेल्वे मार्गावरील अपघातात मृत झालेल्या वन्यजीवांमध्ये वाघ, बिबट्या, गरुड, अजगर, तरस अशा शेड्युल–१ श्रेणीतील इतर अनेक संरक्षित प्राण्यांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भविष्यात उपरोक्त ठिकाणच्या रेल्वे मार्गावरील अपघातांमुळे वन्यजीवांचा नाहक मृत्यू होऊ नये यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (२४-०६-२०२६) :** (१) ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर अंतर्गत येणाऱ्या वनआच्छादीत क्षेत्रातुन रेल्वे मार्ग जात नाही. परंतु बफर क्षेत्राअंतर्गत मुल परिक्षेत्र, मारोडा-१ नियतक्षेत्र येथे समाविष्ट नॉन फॉरेस्ट क्षेत्रातुन फक्त १.२६ किलोमीटरचा रेल्वे मार्ग अस्तित्वात आहे. तसेच सन २००१ ते २०२५ या कालावधीत सदरहु रेल्वे मार्गापैकी ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर अंतर्गत येणाऱ्या मार्गावर वन्यजीव मृत्यूमुखी घटना निरंक आहे.

चंद्रपूर वनृत्तांतर्गत सन २००८ ते २०२५ या कालावधीत एकूण ६१ वन्यजीवांचा रेल्वे अपघातात मृत्यू झालेला आहे. तसेच नागपूर वनवृत्तांतर्गत गोंदिया वनविभाग अंतर्गत गोंदिया-बल्लारशहा रेल्वेमार्गावर गोंदिया, गोरेगाव, सडक/अर्जुनी, नवेगांवबांध व मोरगाव/अर्जुनी हे वनपरिक्षेत्र असून सदर वनपरिक्षेत्रातील बफर क्षेत्रातून ११.९० कि.मी. चा लोहमार्ग जातो. सन २००१ ते २०२५ पर्यंत गोंदिया-बल्लारशहा रेल्वेमार्गावर १२ वन्यजीवांचा रेल्वे अपघातात मृत्यू झालेला आहे.
(२) हे खरे आहे.
(३) वन्यजीवांचा नाहक मृत्यू होऊ नये यासाठी खालीलप्रमाणे प्रभावी उपाययोजना करण्यात येतात.
• जास्त घनदाट जंगलात अ‍ॅन्डरपास तसेच ओवरपास तयार करणे.
• रेल्वे प्रवाश्यांद्वारे रेल्वे रुळावर फेकण्यात येत असलेल्या अन्नाचे संबंधात योग्य विल्हेवाट लावण्याबाबत उपाययोजना करणे.
• संवेदनशिल भागात रेल्वे रुळाच्या दोन्ही बाजुने वन्यप्राण्याच्या सुरक्षेकरीता कठडे लावणे.
• संवेदनशील भागात लोको पायलेटनी हॉर्नचा वापर करणे बंधनकारक.
• संवेदनशील क्षेत्रात रेल्वेची गती कमी करण्याकरीता गतीरोधक फलक लावणे.
• संवेदनशील क्षेत्रात रेल्वेचा वेग ४० कि.मी. प्रति तास ठेवणे.
• क्षेत्रिय कर्मचाऱ्यांद्वारे ज्या क्षेत्रातुन रेल्वे ट्रॅक जात आहे त्या क्षेत्रात नियमित गस्त करण्यात येत आहे.
• रेल्वे ट्रॅक परिसरात आवश्यक त्या ठिकाणी कॅमेरा ट्रॅप लावण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शेंडा पार्क (जि.कोल्हापूर) येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेतल्याबाबत

**(१५) ३१५२ (१०-०७-२०२५) श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेंडा पार्क (जि.कोल्हापूर) येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) स्थापन करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने कृषी विद्यापीठाची ३४ हेक्टर क्षेत्रफळाची जागा हस्तांतरित करण्याबाबतचा निर्णय माहे एप्रिल,२०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, कृषी विद्यापीठाच्या शिक्षण, संशोधन व कृषी क्षेत्रातील इतर उपक्रमासाठी पर्यायी जागा उपलब्ध करून देण्यासाठी कागल, पन्हाळा, हातकणंगले तसेच राधानगरी तालुक्यातील ६० ते १०० हेक्टर एकत्रित क्षेत्रफळ असलेली पर्यायी जागेचा शोध घेऊन पुढील दहा दिवसांत अंतिम निर्णय घेण्याचे निर्देश वित्त व नियोजन मंत्री यांनी कृषी विद्यापीठाच्या समितीस दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यात आयटी हब स्थापन करण्याच्या दृष्टीने शासनामार्फत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबामागील कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (२२-०५-२०२६) :** (१) व (२) तत्कालीन मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०४/१०/२०२३ व दिनांक ०१/०४/२०२५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत शेंडापार्क, जि.कोल्हापूर येथे आ.टी.पार्क स्थापन करण्यासाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या अखत्यारीतील एकूण ३४.३६ हेक्टर जमीन तेवढ्याच मुल्याची पर्यायी शेतीयोग्य जमीन विद्यापीठास उपलब्ध करुन देऊन आयटी पार्क विकसित करण्यासाठी देण्याचे निर्देश तत्कालिन मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांनी दिले होते.

(३) महसूल व वन विभागाने त्यांच्या दिनांक १३/०३/२०२६ च्या शासन ज्ञापनाद्वारे महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या ताब्यातील एकूण ३४.३६ हेक्टर जमीन "आयटी पार्क विकसित करणे" या प्रयोजनासाठी काही अटी व शर्तींच्या अधीन राहून, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास प्रदान करण्यास पूर्वमान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील बंद अवस्थेतील खाणींमध्ये मोठ्या प्रमाणत अपघाती मृत्यू होत असलेबाबत

**(१६) ३३४७ (१०-०७-२०२५) श्री.कृपाल तुमाने, श्री.हेमंत पाटील, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः नागपूर विभागासह विविध जिल्ह्यांमध्ये प्रचलित धोरणानुसार गौण खनिज उत्खननासाठी खाणींना मान्यता देण्यात आलेली असून त्यापैकी अनेक खाणी सद्यःस्थितीत बंद पडल्याने सदर खाणींमध्ये पावसाळयात पाणी साचून अपघात घडत असल्याने त्यात बालकांच्या मृत्यूचे प्रमाणत जास्त असून यासंदर्भातील उच्चस्तरीय चौकशीसाठी स्थानिक नागरीकांकडून वारंवार मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारे अपघाती मृत्यूकरीता जबाबदारी निश्चित करणे तसेच अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तीच्या कुटुंबास अनुदान/मृत्यू निवारण सहाय्य देण्याबाबत शासनाने कोणते धोरण निश्चित केले आहे काय,
(३) असल्यास, अपघातग्रस्त कुटुंबियांना लाभ देण्याबाबत तसेच अपघातास कारणीभूत असलेल्या व्यक्ती अथवा संस्थांविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१७-०३-२०२६) :** (१) (२) व (३) पोलीस स्टेशन यांच्या अहवालानुसार मौजा खापरी राजा,ता.उमरेड जि.नागपूर येथील १८ वर्षापासून बंद असलेल्या खदानमधील पाण्यात आंघोळ करताना दिनांक १२/०५/२०२५ रोजी ५ व्यक्तींचा पाण्यात बुडून मृत्यू झालेला असून, कोणताही घातपात दिसून आलेला नसल्याचे स्पष्ट केले आहे. याप्रकरणी चौकशी करण्यासाठी स्थानिक नागरिकांकडून कुठल्याही प्रकारचा अर्ज अथवा निवेदन उपविभागीय अधिकारी उमरेड यांना प्राप्त झालेला नाही.

अशा प्रकाराच्या घटना राज्यात घडू नये यासाठी,महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम,२०१३ मधील नियम ८० नुसार राज्यातील सुरु असलेल्या खाणपटटयाच्या तपासणी करण्यात येवून, तपासणीअंती खाणपटटाधारक यांनी अटी व शर्तींचा भंग केल्यास निर्देशनास आल्यास प्रचलित कायद्यातील व नियमातील तसेच आदेशात करारनाम्यातील व पर्यावरण अनुमतीचे तरतुदीनुसार कार्यवाही करण्याच्या सूचना दिनांक २३/०५/२०२५ च्या पत्रान्वये सर्व जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांना देण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन(विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील तरतुदीनुसार बंद करण्यात आलेल्या अथवा बंद पडलेल्या खाणीचे व्यवस्थापन करण्यासाठीच्या सुचना दिनांक २९/०७/२०२५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये क्षेत्रिय यंत्रणेस देण्यात आलेल्या आहेत.

तसेच,अशा घटनांमध्ये मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबास अनुदान/मृत्यू निवारण सहाय्य देण्याबाबत शासनाचे धोरण नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शाश्वत आणि पर्यावरणपूरक शेतीसाठी सेंद्रिय शेती पध्दतीला प्रोत्साहन देण्याकरीता विविध उपाययोजना करणेबाबत

**(१७) ३३६० (१७-०७-२०२५) श्री.कृपाल तुमाने, श्री.हेमंत पाटील, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनामार्फत शाश्वत व पर्यावरणपूरक सेंद्रिय शेती पध्दतीला प्रोत्साहन देण्यासाठी विविध धोरणे व योजनांची अंमलबजावणी करण्यात येत असून, सदर धोरणांअंतर्गत राज्यातील शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीसाठी आर्थिक सहाय्य तसेच तांत्रिक मार्गदर्शन व प्रशिक्षण इत्यादी तत्सम स्वरूपाचे सहाय्य उपलब्ध करून देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना सदर धोरणाचा लाभ घेत्ताना प्रमाणन प्रक्रियेत अडथळे येणे, वाजवी बाजारपेठेची उपलब्धता इत्यादी अडचणीना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,दे,
(३) असल्यास, सेंद्रिय पध्दतीने उत्पादित शेतमालास स्थिर व लाभदायक बाजारपेठ उपलब्ध करून मान्यता देण्याच्या प्रक्रिया सुलभ करण्यासंदर्भात कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दत्तात्रय भरणे (१६-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे. नैसर्गिक व सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन देण्यासाठी राज्यात केंद्र पुरस्कृत परंपरागत कृषी विकास योजना आणि राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान तसेच डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती राबविण्यात येत आहेत. सदर योजनांतर्गत गट निर्मिती व शेतकरी उत्पादक कंपनी स्थापना, कंपनी भागधारक शेतकऱ्यांना कंपनीचे समभाग खरेदी करण्यासाठी सहाय्य, शेतकऱ्यांना व क्षेत्रिय पातळीवरील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे, नैसर्गिक /सेंद्रिय शेतीमध्ये रुपांतरण करणेसाठी शेतीवरच निविष्ठा निर्मिती करीता शेतकऱ्यांना अर्थसहाय्य, जैव निविष्ठा संसाधन केंद्र स्थापन करणे, मुल्यवृध्दी, विपणन इ. बाबींसाठी अर्थसहाय्य दिले जाते. सेंदिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र सेंद्रिय प्रमाणिकरण यंत्रणा या संस्थेची येथे स्थापना केली आहे.
(२) व (३) सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना सदर धोरणाचा लाभ घेण्यासाठी सेंद्रिय प्रमाणिकरण प्रक्रियेबाबत क्षेत्रिय अधिकारी/ कर्मचारी यांना प्रशिक्षण दिले जाते, तसेच वेळोवेळी बैठकांच्या माध्यमातून देखील माहिति दिली जाते. मुल्यवृद्धी व विपणन या बाबी अंतर्गत पायाभूत सुविधा निर्मिती साठी अर्थसहाय्य दिले जाते. सेंद्रिय शेतमाल उत्पादित करणाऱ्या शेतकरी उत्पादक कंपन्यांना त्यांच्या परिसरातील शेतमाल उत्पादने व व्यवसायाच्या संधी लक्षात घेऊन प्रचार, प्रसिध्दी, बँड तयार करणे, लोगो तयार करणे, विक्री मेळावे, प्रदर्शने तसेच स्थायी/फिरते विक्री केंद्र, समुह संकलन केंद्र, पॅक हाऊस, शितवाहन, शितगृह, कृषी गोदाम इत्यादी बार्बीचा समावेश आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बार्टी, सारथी, टार्टी, महाज्योती व अमृत इ. साठी मागासवर्गीय संशोधन केंद्र स्थापन करण्याबाबत

**(१८) ३४०१ (१०-०७-२०२५) श्री.संजय खोडके, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती तसेच खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अनुक्रमे बार्टी, टार्टी, सारथी, महाज्योती व अमृत अशा वेगवेगळया स्वायत्त मंडळांची स्थापना करण्यात आली असून बार्टी वगळता अन्य कोणत्याही मंडळाची जिल्हास्तरीय मागासवर्गीय संशोधन केंद्रे अद्याप स्थापन करण्यात आली नसल्याची बाब दिनांक २३ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे,
(२) असल्यास, संशोधन केंद्रांची जिल्हास्तरीय स्थापना अद्याप न झाल्यामुळे संबंधित घटकांतील पालक व विद्यार्थी यांच्या वतीने वारंवार करण्यात येणाऱ्या मागणीच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधींकडून यासंदर्भात शासनाकडे वेळोवेळी लेखी निवेदन सादर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त मागणीसंदर्भात जिल्हानिहाय मागासवर्गीय संशोधन केंद्रे स्थापन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.संजय शिरसाट (०६-०३-२०२६) : (१)**, (२), (३) हे खरे आहे.
महाज्योती संस्थेमार्फत राज्यात प्रत्येक जिल्ह्यात संशोधन केंद्र स्थापन न करता नाशिक, छ. संभाजी नगर, अमरावती, पुणे, कोल्हापूर या ठिकाणी प्रादेशिक कार्यालय स्थापन करण्यात आले असून इतर मागास बहुजन कल्याण विभागाअंतर्गत येत असलेल्या महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील सहाय्यक संचालक, इ.मा.ब.क यांची महाज्योतीचे नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. महाज्योती संस्थेमार्फत सुरू करण्यात आलेले प्रादेशिक कार्यालय तसेच नोडल अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आलेले सहाय्यक संचालक यांच्या मार्फत विविध योजनांचे कामकाज प्रत्येक जिल्ह्यात सुरू असून लाभार्थी घटकातील पालक व विद्यार्थी यांच्या वतीने प्राप्त लेखी निवेदन व अडचणी मुख्य कार्यालयात पाठविण्यात येऊन त्यांचे निराकरण करण्यात येते.
सारथी, पुणे या संस्थेमार्फत विभागीय स्तरावर कोल्हापूर, नागपूर इ. ठिकाणी उपकेंद्रे स्थापन करण्यात आलेली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे आणि मीरा-भाईदर परिसरातील अनधिकृत बांधकाम निष्कसित करण्याबाबत

**(१९) ३५०८ (१०-०७-२०२५) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे व मीरा-भाईंदर परिसरामध्ये अनेक नवीन बांधकामे स्थानिक प्राधिकरणाची परवानगी न घेता सुरू करण्यात आलेली असून जुन्या बांधकामांवर मात्र संबंधित अधिकाऱ्यांकडून नोटीसा बजाविण्यात येत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एकाच फेरफार असलेल्या मिळकतदारांवर स्वामित्व शुल्क एकत्रितपणे आकारणे हे योग्य नसताना यासंदर्भात तातडीने कारवाई करुन शासकीय जमिनींवर फलक लावून त्या ताब्यात घेण्याच्या तसेच मीरा-भाईदर मधील कामांची प्रत्यक्ष पाहणी करून दोषी आढळल्यास जागेवरच कारवाई करण्याच्या व ठाणे व मीरा-भाईंदर परिसरातील जुन्या बांधकामांबाबत नागरिकांनी केलेल्या तक्रारींचे लवकरात लवकर निवारण करुन लोक अदालतीद्वारे प्रकरणे निकाली काढण्याच्या सूचना महसूल मंत्री महोदयांनी दिल्या आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा, मंत्री महोदयांनी दिलेल्या उक्त सूचनांच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली तसेच ठाणे व मीरा-भाईंदर परिसरामधील अनेक नवीन अनधिकृत बांधकामां विरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१२-०६-२०२६) :** (१), (२), (३) व (४) शासन निर्णय क्र. कडोंमपा-१००६/प्र.क्र.१९२/०६/नवि-२८ दिनांक ०२/०३/२००९ नुसार ठाणे महानगरपालिका क्षेत्रात झालेल्या अनधिकृत बांधकामांपैकी अव्याप्त अनधिकृत बांधकामांवर प्रभाग कार्यालय स्तरावर सहाय्यक आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी यांचेमार्फत व व्याप्त अनधिकृत बांधकामांबाबत कायदेशीर कार्यवाहीची प्रक्रिया (DPL) पूर्ण करुन निष्कासनाची कारवाई करण्यात येत आहे. ठाणे महानगरपालिका क्षेत्रात नजिकच्या काळात झालेल्या /सद्य:स्थितीत सुरु असलेल्या अनधिकृत बांधकामावर कारवाई करणेकरीता महानगरपालिकेमार्फत बिट मुकादाम व बिट निरीक्षकांची नेमणूक करून विशेष मोहिम राबवून प्रभाग समिती स्तरावर व मुख्यालयाकडील पथकामार्फत आजमितीस एकूण २९८ अनधिकृत बांधकामावर संपूर्ण निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.

तसेच ठाणे शहरात सुरु असलेल्या अनधिकृत बांधकामांना विद्युत पुरवठा, पाणीपुरवठा व इतर सोयीसुविधा पुरविण्यात येवू नये, याकरीता टोरंटो पॉवर कंपनी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी व उपनगर अभियंता, पाणीपुरवठा विभाग, ठामपा यांना कळविण्यात आले आहे. अनधिकृत बांधकामांमधील सदनिका / गाळे यांची नोंदणी करण्यात येवू नये, याबाबत उप निबंधक, दुय्यम निबंधक कार्यालय, ठाणे यांना कळविण्यात आले असून अनधिकृत बांधकामामध्ये सदनिका / गाळे खरेदी करु नये म्हणून विविध प्रसार माध्यमातून नागरिकांना जाहीर आवाहन करण्यात येत आहे. अनधिकृत बांधकामांवर प्रभावी कारवाई न केल्यामुळे सहाय्यक आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी व बिट निरीक्षक यांचेवर निलंबनाची कारवाई करण्यात आली असून विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामावर प्रभावीपणे कारवाई होणेकरीता आढावा बैठक घेण्यात येऊन अनधिकृत बांधकाम होणार नाहीत याची दक्षता घेणेबाबत निर्देश देण्यात येत आहेत.

शासकीय जमिनीवरील अतिक्रमण निष्कासित करण्याची कारवाई ही या कार्यालयाचे अधिनस्त तहसिलदार कार्यालय, ठाणे व अपर तहसिलदार कार्यालय, मिरा भाईंदर यांचे स्तरावर करणेत येत असून, शासकीय जमिनीवर फलक लावून ती शासनाच्या ताब्यात घेण्याची कारवाई करण्यात येते.

तसेच जुन्या बांधकामांबाबत नागरिकांनी केलेल्या तक्रारींचे लवकरात लवकर निवारण करुन लोक अदालतीव्दारे प्रकरणे निकाली काढण्याच्या सूचना प्राप्त झालेल्या नाहीत.

तथापि, शासकीय जमिनीवरील अनधिकृत बांधकामांविरुध्द शासनाच्या प्रचलित धोरणानुसार नियमानुसार वेळोवेळी कारवाई करणेत येते.

---

## लेंडी (ता.मुखेड, जि.नांदेड) धरणाच्या बॅक वॉटरमुळे नागरिकांचे जिवितास धोका निर्माण झाल्याबाबत

**(२०) ५१०४ (१४-१२-२०२५) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंतरराज्यीय लेंडी धरणाची पायाभरणी सन १९८६ मध्ये झाल्यानंतरही पुनर्वसनाची ठिकाणे गैरसोयीची असल्यामुळे चार गावांतील चारशे कुटूंबांनी गाव सोडले नसल्यामुळे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्या सुमारास झालेल्या मोठ्या पावसामुळे व ढगफुटीमुळे चार गावात बॅक वॉटर घुसून कुटूंबांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होऊन नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे,

हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या चार गावांतील नागरिकांचे अद्याप पुनर्वसन न होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास शासनाने सदर प्रकरणी चौकशी करून त्यानुषंगाने उपरोक्त चार गावातील नागरिकांचे तात्काळ पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच पुनर्वसनाच्या कामास विलंब करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील)(०२-०७-२०२६) :** (१) हे खरे नाही.

लेंडी धरणाच्या बुडीत क्षेत्रात एकूण १२ गावठाणे येत असून पुनर्वसनाच्या दोन टप्प्यांध्ये सदर गांवाचे पुनर्वसन करण्यात आले आहे. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ नुसार अनुज्ञेय असलेल्या सर्व नागरी सुविधांची कामे पूर्ण करण्यात आलेली असून पुनर्वसन गावठाण येथील पूर्ण करण्यात आलेल्या नागरी सुविधा जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक २७/०४/२०२२ व २९/०४/२०२२ रोजी हस्तांतरण करण्यात आलेल्या आहेत.

तसेच, सन २०२४ मध्ये सदर प्रकरल्पाच्या वाढीव कुटुंबाना विशेष बाब म्हणून वाढीव पुनर्वसन अनुदान वाटप करताना बुडीत क्षेत्रातील सर्व गावातील प्रत्येक प्रकल्पग्रस्तांनी जुन्या घराचा ताबा सोडत असल्याबाबत बंधपत्र सादर केलेले आहेत. कार्यकारी अभियंता लेंडी प्रकल्प विभाग देगलूर यांनी दिनांक १६/०५/२०२५ रोजीच्या अन्वये पळभरणीच्या बुडीत क्षेत्रातील ग्रामस्थांना प्रथम टप्प्यातील गावातून स्थलांतरणाबाबत नोटीस दिली होती व नवीन गावठाणात स्थलांतरीत होण्याबाबत कळविले होते.

तसेच पुराबाबत जलशास्त्रिय परिगणना करण्यात आली असून त्यानुसार धरणाच्या बॅक वॉटरमुळे सदर गावे बुडीत झालेली नसून ढगफुटीसदृश्य पावसामुळे बुडीत क्षेत्रातील ८ गावात (रावणगाव, भिंगोली, भासवाडी, भेडेगांव (खु.), बळंकी, भाटापूर, हसनाळ व मारजवाडी) पुराचे पाणी शिरले होते.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.